
जेसी ओवेन्स

ऑलिम्पिक नायक



फ़्रांसीन सबीन

मराठी: अश्विनी बर्वे

जेसी ओवेन्स

ऑलिम्पिक नायक

फ्रांसीन सबीन

मराठी: अश्विनी बर्वे



शाळेत जाण्यापूर्वी दररोज सकाळी, तरुण जेसी ओवेन्स आणि त्याचे प्रशिक्षक हायस्कूलच्या क्रीडांगणावर भेटत असत. वर्गात जाण्यासाठी घाईने निघण्यापूर्वी, हा किशोरवयीन खेळाडू ट्रॅकवर ४५ मिनिटे सराव करत असे. जेसीला दुपारच्या वेळी ट्रॅक टीममधील इतर खेळाडूंसोबत सराव करायला आवडले असते; पण त्याला ते शक्य नव्हते, कारण त्याला कामावर जावे लागत असे. त्यातून मिळणाऱ्या पैशांमुळे ओवेन्स कुटुंबाचा उदरनिर्वाह चालण्यास मदत होत असे.


अनेकदा तरुण जेसी ओवेन्सला पहाटेच्या त्या सरावाच्या वेळी जायला नको वाटे.. पण प्रशिक्षक चार्ल्स रायली मात्र कधीच गैरहजर राहायचे नाहीत, त्यामुळे हा तरुण धावपटूही तिथे न चुकता हजर राहायचा. जेसीला हे मान्य करावं लागलं की, त्या कष्टांचं फळ मिळत होतं. जसजसे आठवडे उलटत गेले, तसतसा तो अधिक वेगवान आणि कणखर होत चालला होता. तरीही, एका प्रसन्न वसंत ऋतूच्या सकाळी जेव्हा त्याने 'हंड्रेड यार्ड डॅश' (१०० यार्डांची शर्यत) पूर्ण केली, तेव्हा मिस्टर रायलींची प्रतिक्रिया त्याला समजली नाही.जेसीने फिनिश लाइन (शर्यत संपण्याची रेषा) वेगाने ओलांडली, तेव्हा प्रशिक्षक रायलींनी त्यांचे स्टॉपवॉच बंद केले. प्रशिक्षकांनी एकदा घड्याळाकडे पाहिले, पुन्हा पाहिले आणि मान हलवली. मग त्यांनी घड्याळ पुन्हा चालू केले आणि ते खरोखरच चालत आहे ना, याची खात्री करण्यासाठी ते आपल्या कानाशी धरले. जेसी हे सर्व पाहत होता आणि नक्की काय गडबड आहे, याचा विचार करत होता.मिस्टर रायलींनी खिशातून मोजपट्टी (टेप मेजर) काढली, ते 'स्टार्टिंग लाइन'कडे (शर्यत सुरू होण्याच्या रेषेकडे) गेले आणि त्यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंतचे अंतर मोजायला सुरुवात केली. आता जेसी अधिकच गोंधळून गेला होता, विशेषतः जेव्हा मिस्टर रायलींनी ते अंतर दुसऱ्यांदा मोजले. "काही गडबड आहे का, कोच?" जेसीने अखेरीस...विचारले.



श्री. रायली त्या गोंधळलेल्या किशोरवयीन मुलाजवळ आले आणि त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. "जेसी," श्री. ॲली म्हणाले, "तू आत्ता जे केलंस, ते आजपर्यंत कोणत्याही हायस्कूल ॲथलीटला जमलेलं नाही. तू शंभर-यार्ड धावण्याच्या शर्यतीच्या जागतिक विक्रमाची बरोबरी केली आहेस!"जेसीला आश्चर्याचा धक्का बसला. त्याला माहीत होतं की, ट्रॅक मीटमध्ये तो ज्या क्लीव्हलँड, ओहायो येथील इतर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करायचा, त्यांच्यापेक्षा तो अधिक वेगाने धावू शकत होता. पण जागतिक विक्रम! अर्थात, जेसीला हे माहीत होतं की प्रॅक्टिसमध्ये विक्रमी वेळेत धावल्याने कोणत्याही विक्रम पुस्तकात त्याची नोंद होणार नाही. तरीही, आता त्याने ते करून दाखवलं होतं, त्यामुळे त्याला खात्री होती की तो ते पुन्हा करू शकतो. फक्त त्याला एक संधी हवी होती..







१२ सप्टेंबर, १९१३ रोजी जेव्हा जेम्स क्लीव्हलँड ओवेन्सचा जन्म झाला, तेव्हा तो फार काळ जगेल अशी शक्यताही वाटत नव्हती. हे बाळ मोठे होऊन जगातील सर्वात वेगवान खेळाडू होईल, अशी कल्पना करायला निश्चितच काही कारण नव्हते.

जेसीची सुरुवातीची वर्षे अलाबामातील ओकव्हिल येथे गरिबीत गेली. त्याचे वडील आणि आई, हेन्री आणि एमा ओवेन्स, वाटयाने शेती करत होते. ते पन्नास एकरच्या शेतावर राहत होते. तिथे ते शेताचे मालक श्री. जॉन क्लॅनन यांच्यासाठी कापूस पिकवत असत. श्री. क्लॅनन यांच्या मालकीची २५० एकर जमीन होती, ज्यावर वाटेकरी शेतकऱ्यांची आठ कुटुंबे शेती करत असत. एक वाटेकरी शेतकरी जमीनदाराकडून बियाणे - सहसा कापसाचे बियाणे - विकत घेत असे. मग तो बियाणे लावत, पीक वाढवत आणि त्याची कापणी करत असे. जेव्हा पीक विकले जात असे, तेव्हा जमीनदार आणि वाटेकरी शेतकरी नफा वाटून घेत असत.

वाटेकरी शेती ही एक न्याय्य व्यवस्था वाटू शकते, पण ती क्वचितच तशी होती. वाटेकरी शेतकऱ्याला जमीनदाराकडून अन्न, कपडे, अवजारे, बियाणे आणि इतर प्रत्येक गरजेच्या वस्तू विकत घेण्यास भाग पाडले जात असे. मालक वर्षाच्या शेवटी त्याला देय असलेली रक्कम ठरवत असे. तो ती रक्कम वाटेकरी शेतकऱ्याला मिळणाऱ्या नफ्यातून वजा करत असे. सहसा असे घडायचे की, पिकांवर झालेल्या नफ्यापेक्षा वाटेकरी शेतकऱ्याला देय असलेली रक्कम जास्त असायची. वर्षानुवर्षे, बहुतेक वाटेकरी शेतकरी कर्जात अधिकच बुडत गेले. ही एक प्रकारची गरिबी होती, ज्यातून सुटका नव्हती. जमीनदाराच्या हिशेब ठेवण्याच्या पद्धतीबद्दल तक्रार करणाऱ्या वाटेकरी शेतकऱ्यांना अनेकदा आपले सामान बांधून दुसरीकडे जाण्यास सांगितले जात असे.बहुतेक वाटेकरी शेतकऱ्यांप्रमाणेच, जेसीचे आई-वडील जमीनदाराला नाराज करण्याच्या सततच्या भीतीत जगत होते. मिस्टर क्लॅनन त्यांची फसवणूक करत आहेत हे त्यांना माहीत होते, पण ते काहीही करू शकत नव्हते. त्यांना वाचता किंवा अंकगणित करता येत नव्हते, याचा अर्थ त्यांच्याकडे मिस्टर क्लॅननचे आकडे आणि दुकानाची बिले तपासण्याचा कोणताही मार्ग नव्हता.



तरीही श्री. आणि श्रीमती ओवेन्स एका बाबतीत नशीबवान होते. त्यांना शेतात काम करू शकणारी सहा धष्टपुष्ट मुले होती. फक्त किरकोळ शरीरयष्टीचा जे.सी., जे जेम्स क्लीव्हलँडचे टोपणनाव होते, तो जास्त मदत करू शकत नसे. तो इतका अशक्त होता. घरात त्याचे काम फक्त जगणे आणि आपला वाटा उचलण्याइतके सशक्त होण्याचा प्रयत्न करणे हेच होते.




प्रत्येक हिवाळ्यात त्या लहान मुलाला न्यूमोनिया व्हायचा. हिवाळ्यांमध्ये जे.सी.ला सतत खोकला आणि ताप यायचा, पण त्याला द्यायला कोणतीही औषधे नव्हती. तसेच, ओकविलमध्ये डॉक्टरही नव्हते. जरी डॉक्टर असता तरी, ओवेन्स कुटुंबाला वैद्यकीय उपचारांचा खर्च परवडणारा नव्हता.

ओवेन्स कुटुंबाच्या राहणीमानामुळे सी.च्या खालावलेल्या प्रकृतीत काहीच सुधारणा झाली नाही. ते पुठ्ठा आणि जुन्या लाकडापासून बनवलेल्या एका झोपडीत राहत होते.

जेव्हा जेव्हा पाऊस पडायचा, तेव्हा छप्पर गळायचे. थंडीच्या दिवसांत, बर्फाळ वारे थेट घरातून वाहायचे, ज्यामुळे आतमध्येही बाहेरइतकीच थंडी असायची.घरातली एकमेव ऊब शेकोटीतून मिळायची, जिथे मिसेस ओवेन्स जेवण बनवायच्या. त्या झोपडीत स्टोव्ह नव्हता, नळाचे पाणी नव्हते, स्नानगृह नव्हते आणि फर्निचरही जवळजवळ नव्हतेच. हिवाळ्याच्या रात्री, मिसेस ओवेन्स जे.सी.ला घोंगडीत गुंडाळून शेकोटीजवळ झोपवायच्या. पुरेसे अन्न मिळवणे ही आणखी एक समस्या होती. मिसेस ओवेन्स यांची झोपडीच्या मागे एक छोटी भाजीची बाग होती. बागेतील बटाटे, घेवडा आणि मका हेच कुटुंबाच्या जेवणाचा मुख्य भाग असायचे. जेव्हा जे.सी.च्या मोठ्या भावांपैकी कोणीतरी ससा मारायचा, तेव्हा जेवणाच्या टेबलावर मांस असायचे. कुटुंबाला त्यांचे इतर सर्व अन्न मिस्टर क्लॅननच्या दुकानातून विकत घ्यावे लागत असे. यात त्या हॅमचाही समावेश होता, जे ओवेन्स कुटुंब वर्षातून फक्त दोनदा—इस्टर आणि ख्रिसमसला—खाऊ शकत असे.

जे.सी. सहा वर्षांचा असताना, १९१९ च्या हिवाळ्यात त्याची प्रकृती खालावली. त्याचा न्यूमोनिया तर परत आलाच, पण त्याच्या डाव्या पायावर एक मोठी गाठही आली. जसजसे आठवडे जात होते, तसतशी ती गाठ मोठी होत गेली. त्या गाठीमुळे त्याला वेदना होत होत्या आणि चालताना तो लंगडत असे. लवकरच, जे.सी.ला धड चालताही येत नव्हते आणि त्याच्या आईने पायावर ठेवलेल्या गरम पट्ट्यांचाही काही उपयोग होत नव्हता.श्रीमती ओवेन्स यांना भीती वाटत होती की या संसर्गामुळे त्यांच्या लहान मुलाचा मृत्यू होईल. त्यांनी त्याला बसवले आणि म्हणाल्या, "जे.सी., हे खूप दुखेल, पण तुझ्या आईला हे करावंच लागेल." मग श्री. ओवेन्स आणि जे.सी.च्या एका भावाने त्याला धरले, तर त्याच्या आईने ती गाठ कापली. वेदना असह्य होत्या आणि जे.सी. ओरडू नये म्हणून धडपडत होता.त्याला नंतर आठवल्याप्रमाणे, "आई तिचं काम करत राहिली, आणि शेवटी ते संपलं. पण ते 'कापून घेणं' माझ्यासाठी खरंच खूप चांगलं ठरलं... कारण त्या दिवसापासून, कोणत्याही शारीरिक वेदनेचा किंवा त्रासाचा माझ्यावर फारसा परिणाम झाला नाही."





त्या सुरुवातीच्या अनुभवामुळे तो वेदना आणि थकव्यावर नेहमीच मात करू शकत होता. त्याला कितीही वेदना होत असल्या किंवा कितीही थकवा जाणवत असला तरी, त्याच्या पायाच्या त्या शस्त्रक्रियेच्या वेदना आणि दहशतीची कशाशीच तुलना होऊ शकत नव्हती.जेव्हा जे.सी.च्या पायावरची गाठ नाहीशी झाली आणि हिवाळ्याचे रूपांतर वसंतात झाले, तेव्हा तो आनंदी झाला. न्यूमोनिया पुन्हा गेला होता आणि तो लहान मुलगा घराबाहेर धावू शकत होता. धावणे ही जे.सी. साठी एक विशेष गोष्ट होती. कारण त्याचे वडील, ज्यांच्यावर जे.सी.चे खूप प्रेम होते, ते त्या परगण्यातील इतर कोणाहीपेक्षा जास्त वेगवान धावपटू होते.रविवारी, चर्चनंतर, शेजारी कधीकधी एकत्र जमत असत. ते एकत्र बसून गप्पा मारत किंवा सुसमाचाराची गाणी गात असत. हवामान चांगले असताना पुरुष धावण्याच्या शर्यती लावत. श्री. ओवेन्स त्यांनी भाग घेतलेली प्रत्येक शर्यत जिंकत, ज्यामुळे जे.सी.ला खूप अभिमान वाटत असे. त्याला आपल्या वडिलांना कापूस वेचणारा न मानता धावपटू समजायला आवडत असे. धावपटू असणे ही एक अद्भुत, मुक्त गोष्ट आहे असे त्याला वाटत असे. जगात इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा, जे.सी.लाही तेच व्हायचे होते.

· जे.सी.साठी धावणे हाच एकुलता एक विरंगळा होता. त्याच्याकडे खेळणी किंवा खेळ नव्हते. त्याच्या शेताजवळ इतर मुले नव्हती आणि त्याचे भाऊ-बहिणी रोज आई-बाबांसोबत शेतात काम करत असत. आणि, ओकविलमध्ये कृष्णवर्णीय मुलांसाठी शाळा नसल्यामुळे, जे.सी. शाळेत गेला नाही.बऱ्याच काळापासून, श्री. आणि श्रीमती ओवेन्स वाटेकरी शेतीच्या जीवनातून सुटका करून घेण्याबद्दल बोलत होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी, त्यांना उत्तरेकडे जावे लागणार होते, जिथे चांगल्या जीवनाच्या संधी मिळू शकतील.पण जे.सी.च्या आई-वडिलांना भीती वाटत होती. ओकविल हेच त्यांचे एकमेव घर होते. काही मैल दूर असलेल्या डेकाटूर या छोट्या शहरापलीकडे त्यांनी कधी प्रवासही केला नव्हता. उत्तरेकडे ते कोणालाही ओळखत नव्हते आणि तिथल्या अनोळखी जगाची त्यांना भीती वाटत होती.प्रत्येक वेळी जेव्हा स्थलांतराची चर्चा व्हायची, तेव्हा श्री. आणि श्रीमती ओवेन्स ओकविलमध्येच राहण्याचा निर्णय घ्यायचे. मग, फेब्रुवारी १९२१ मध्ये, दोन गोष्टी घडल्या ज्यामुळे अखेरीस त्यांचे मत बदलले. पहिली गोष्ट म्हणजे, जे.सी.ला न्यूमोनिया झाला होता. रिस्थिती पूर्वीपेक्षाही वाईट झाली होती. तो आठ वर्षांचा मुलगा प्रत्येक खोकल्यासोबत रक्त थुंकत होता. त्याच्या आईला खात्री होती की तो पुढचा हिवाळा जगू शकणार नाही.





श्री. ओवेन्स यांच्या कमाईत मोठा वाटा घ्यावा. जेव्हा श्री. ओवेन्स यांनी हे योग्य नाही असे सांगून विरोध केला, तेव्हा श्री. क्लॅनन यांनी त्यांना सांगितले की वाटेकरी शेतकऱ्यांना जास्त वाटा मिळण्याचा हक्क नसतो. त्यांच्यासमोर दोन पर्याय होते: एकतर श्री. क्लॅनन यांच्या अटी स्वीकारणे किंवा जमीन सोडून निघून जाणे.दोन दिवस श्री. ओवेन्स कोणाशीही फारसे बोलले नाहीत. मग रविवारी, चर्चमधून परत आल्यावर, त्यांनी आपल्या कुटुंबाला श्री. क्लॅनन यांच्यासोबत काय घडले होते आणि त्यांनी कोणता निर्णय घेतला होता हे सांगितले. ते कुटुंब उत्तरेकडे स्थलांतरित होणार होते.त्यांची पाच खेचरे आणि शेतीची अवजारे, जी त्यांच्या मालकीची मौल्यवान वस्तू होती, विकल्यानंतर ओवेन्स कुटुंबाकडे थोडी रोख रक्कम उरली. या पैशातून त्यांनी रेल्वेची तिकिटे काढली, तसेच श्री. ओवेन्स यांना नोकरी मिळेपर्यंत उदरनिर्वाहासाठी थोडे पैसेही शिल्लक राहिले.त्या कुटुंबाने क्लीव्हलँड, ओहायो हे आपले नवीन घर म्हणून निवडले. क्लीव्हलँडमध्ये ते कोणालाही ओळखत नव्हते, पण त्यांनी ऐकले होते की ते राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी एक चांगले ठिकाण आहे.

१९२१ च्या वसंत ऋतूमध्ये, ओवेन्स कुटुंबाने आपले थोडेफार सामान बांधले आणि लुईव्हिल अँड नॅशनल रेल्वेने उत्तरेकडे प्रवास सुरू केला. जेव्हा ते क्लीव्हलँडला पोहोचले, तेव्हा त्यांनी शहराच्या पूर्व बाजूला असलेल्या एका तीन मजली, लाकडी घरात एक लहान अपार्टमेंट भाड्याने घेतले.तरुण जे.सी.साठी हे एक रोमांचक नवीन जग होते. तिथे पदपथ, पक्के रस्ते आणि कितीतरी घरे होती! माणसे जणू सर्वत्र दिसत होती. इतकेच काय, त्यांच्या नवीन अपार्टमेंटमध्ये नळाचे पाणी आणि वीजसुद्धा होती.जर जे.सी. घरातून उत्तरेकडे चालत गेला, तर तो एरी सरोवराच्या चमचमत्या पाण्यापर्यंत पोहोचायचा. तिथे तो मालाने भरलेल्या बोटी दूरच्या शहरांकडे जाताना पाहत असे. जर तो पूर्वेकडे चालत गेला, तर तो एका सुंदर उद्यानात पोहोचायचा, जिथे विस्तीर्ण हिरवीगार जागा आणि एक तलाव होता, जिथे मुले पाण्यावर दगड उडवत असत आणि त्याने तिथे खेळण्यांच्या बोटी चालवल्या. जे.सी.च्या घराच्या दक्षिणेला आणि पश्चिमेला दुकाने, खडखडाट करणाऱ्या ट्राम गाड्या, चित्रपटगृहे आणि रात्री रस्ता उजळवणारे दिवे होते.





सेंट क्लेअर्स ग्रामर स्कूलमधील त्याच्या पहिल्या दिवशी तो उत्साहाने जवळजवळ निःशब्द झाला होता. जेव्हा त्याच्या शिक्षिकेने त्या लाजाळू लहान मुलाला त्याचे नाव विचारले, तेव्हा तो कुजबुजला, "जे.सी., मॅडम." शिक्षिका हसल्या आणि म्हणाल्या, "वर्गात तुझे स्वागत आहे, जेसी." लहान जे.सी. इतका घाबरला होता की त्याने शिक्षिकेला दुरुस्त केले नाही. परिणामी, त्याचे नाव शाळेच्या नोंदींमध्ये जेसी ओवेन्स असे नोंदवले गेले. त्याला ते नाव उच्चारायला आवडले आणि त्याने आयुष्यभर तेच नाव वापरले.जेसीला शाळा, वाचायला-लिहायला आणि अंकगणित शिकायला खूप आवडायचे. त्याला त्याच्या वयाचे इतके मित्र मिळाल्याचाही आनंद होता. जेसीला फक्त एकच खंत होती की तो शाळेनंतर त्यांच्यासोबत खेळू शकत नव्हता. ग्रामर स्कूलमध्ये असतानासुद्‌धा, जेसीला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काम करावे लागत होते.

ओवेन्स कुटुंबाला वाटले होते तितके क्लीव्हलँडमधील आयुष्य सोपे नव्हते. श्री. ओवेन्स यांच्याकडे कोणतेही औपचारिक शिक्षण किंवा कौशल्ये नव्हती, त्यामुळे त्यांना स्थिर नोकरी मिळू शकली नाही. त्यामुळे श्रीमती ओवेन्स आणि मुलांना काम करणे आवश्यक झाले. काही दिवसांत, जेसी शाळा संपताच एका स्थानिक फुलांच्या दुकानात धावत जायचा, जिथे तो डिलिव्हरी बॉय म्हणून काम करायचा. इतर दिवशी, तो पेट्रोल पंपावर काम करायचा. तो किराणा सामान पोहोचवणे, बूट पॉलिश करणे आणि परिसरात मिळेल ती इतर छोटी-मोठी कामेही करायचा. अलाबामातील परिस्थितीपेक्षा जेसीचे आरोग्य आता बरे होते, तरीही तो खूपच बारीक होता. जेसीच्या बारीकपणामुळेही, त्याच्यात असे काहीतरी होते जे प्रशिक्षक चार्ल्स रायली यांच्या नजरेत भरले— सुट्टीच्या वेळी शाळेच्या मैदानावरील शर्यतींमधील जेसीचा वेग. श्री. रायली हे जेसीच्या शाळेत व्यायामाचे शिक्षक होते, तसेच फेअरमाँट ज्युनियर हायस्कूल आणि ईस्ट टेक्निकल हायस्कूलमध्ये ट्रॅकचे प्रशिक्षक होते.१९२३ च्या शरद ऋतूत, प्रशिक्षक रायली यांनी दहा वर्षांच्या जेसीला विचारले की त्याला ट्रॅक टीममध्ये सामील व्हायला आवडेल का. जेसी खूप आनंदित झाला आणि म्हणाला, "हो!"





सुरुवातीला, जेसी फार दूर धावू शकत नव्हता आणि लगेच थकून जायचा. कधीकधी त्याला सोडून देण्याचा विचार यायचा. त्याला खात्री होती की महत्त्वाच्या शर्यती जिंकण्याइतका तो कधीच चांगला होऊ शकणार नाही. प्रत्येक वेळी जेव्हा तो असे म्हणायचा, तेव्हा मिस्टर रायली जेसीला धीर धरायला सांगायचे. "पुढच्या शुक्रवारपासून तू चार वर्षांसाठी प्रशिक्षण घेणार आहेस," प्रशिक्षक हसत म्हणाले. तो त्यांचा एक विनोदच बनला होता— मोठी शर्यत नेहमीच पुढच्या शुक्रवारपासून चार वर्षांनी होणार होती.जेव्हा जेसी फेअरमाँट ज्युनियर हायस्कूलमध्ये शिकत होता, तेव्हा तो त्याच्या पहिल्या आंतरशालेय ट्रॅक स्पर्धेत धावला. क्लीव्हलँडमधील सर्व ज्युनियर हायस्कूलमधील सर्वोत्तम धावपटू त्या स्पर्धेत सहभागी होणार होते आणि जेसी घाबरला होता. पण स्टार्टरची बंदूक वाजताच त्याची भीती नाहीशी झाली आणि त्याने शंभर-यार्डांची शर्यत काही यार्डांच्या फरकाने जिंकली.शर्यतीनंतर, मिस्टर रायली जेसीच्या आईला म्हणाले, "तुमच्या मुलाचे पाय या पृथ्वीवरील सर्वात असामान्य आहेत. मला माहित आहे की हे ऐकून तुम्हाला धक्का बसेल, पण जेसी ऑलिम्पिक चॅम्पियन होऊ शकतो." अनेक वर्षांनंतर जेसीच्या आईने त्याला सांगितले की प्रशिक्षक काय म्हणाले होते. तोपर्यंत कोच रायलीचे भाकीत खरे ठरले होते.

ज्युनियर हायस्कूलमध्ये असतानाच, जेसी फूकने ऑलिम्पिक यशाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले. त्याने शंभर मीटरची धावण्याची शर्यत दहा सेकंदात पूर्ण केली, आणि त्याच्या वयाच्या मानाने ही वेळ इतकी उल्लेखनीय होती की दुसऱ्या दिवशी क्लीव्हलँडच्या वृत्तपत्रांमध्ये या शर्यतीची बातमी छापून आली.हा असाधारण धावपटू सतत सुधारणा करत राहिला. त्याने प्रशिक्षक रायली यांच्यासोबत कठोर परिश्रम घेऊन अधिक वेगवान सुरुवात, एक लयबद्ध गती आणि योग्य शेवट साधण्याचा सराव केला. ईस्ट टेक्निकल हायस्कूलच्या ट्रॅक टीमचा सदस्य म्हणून, जेसी प्रत्येक धावण्याच्या आणि रिले शर्यतीत चमकत असे. याव्यतिरिक्त, त्याने अडथळ्यांच्या शर्यतीत (हर्डल्स) धावायला सुरुवात केली.अडथळ्यांच्या शर्यतीत धावण्यासाठी, धावपटूला अनेक अडथळ्यांवरून उडी मारावी लागते. हे अडथळे तीन फुटांपेक्षा थोडे उंच असतात. अडथळ्यांच्या शर्यतीत वेगासोबतच अचूक टायमिंगची आवश्यकता असते, आणि जेसी लवकरच या स्पर्धेतही विजेता बनला.




पुढे, कोच रायली यांच्या सल्ल्यानुसार, जेसीने लांब उडीचा सराव सुरू केला. या प्रकारात, ज्याला आता लांब उडी म्हटले जाते, स्पर्धक जमिनीवर ठेवलेल्या फळीच्या दिशेने धावतो, एक पाय फळीवर ठेवतो आणि पुढे झेप घेतो. ही उडी 'खड्डा' नावाच्या वाळूच्या भागात संपते. उडीचे अंतर टेकऑफच्या फळीपासून ते उडी मारणारा खड्ड्यात जिथे उतरतो तिथपर्यंत मोजले जाते. जेसी लवकरच एक उत्कृष्ट लांब उडीपटू तसेच ट्रॅक स्टार बनला.

१९३३ पर्यंत, जेसी ओवेन्सची कीर्ती राज्यभर पसरली होती. त्या वर्षी, इलिनॉयमधील शिकागो विद्यापीठात राष्ट्रीय आंतरशालेय चॅम्पियनशिप स्पर्धा होणार होती. जेसी तणावाखाली होता. देशभरातील क्रीडा पत्रकार आणि महाविद्यालयीन प्रशिक्षकांसमोर त्याला कडव्या स्पर्धेला सामोरे जायचे होते.



त्या स्पर्धेत जे घडले ते आता ट्रॅक-अँड-फील्डच्या इतिहासात नोंदले गेले आहे. जेसी ओवेन्सने ९.४ सेकंदात शंभर-यार्ड धावण्याची शर्यत जिंकून एक जागतिक आंतरशालेय विक्रम प्रस्थापित केला. त्याने २०.७ सेकंदात २२०-यार्ड धावण्याची शर्यत आणि २४ फूट, ९ आणि ५/८ इंच लांब उडी मारून लांब उडीची स्पर्धाही जिंकली. एका क्रीडा पत्रकाराच्या शब्दांत सांगायचे तर, ही एक अभूतपूर्व तिहेरी कामगिरी होती.



जेसी हायस्कूलमधून पदवीधर होण्याच्या जवळ होता, आणि संपूर्ण अमेरिकेतील महाविद्यालयांकडून शिष्यवृत्तीच्या अनेक संधी येत होत्या. आपल्या मुलाला मिळालेल्या या संधीमुळे त्याचे आई-वडील खूप आनंदित झाले होते. आयुष्य कितीही कठीण असले तरी, क्लीव्हलँडला जाण्याचा त्यांचा निर्णय यशस्वी ठरला होता, हे त्यांना आता कळून चुकले होते. जेसी ओवेन्स महाविद्यालयात जाणार होता—त्यांच्या कुटुंबातील असे करणारी ती पहिलीच व्यक्ती ठरणार होती.जेसी उच्च शिक्षणासाठी आणि महाविद्यालयीन स्तरावर स्पर्धा करण्याच्या संधीसाठी उत्सुक होता. पण त्याला एक गोष्ट सतावत होती. वेळ निघून जात होता, आणि त्याने महाविद्यालयाची कोणतीही संधी स्वीकारली नव्हती. कोच रायली यांना काय चुकले आहे याचा विचार पडू लागला, आणि त्यांनी जेसीला या विलंबाचे कारण विचारले. जेसी म्हणाला की, त्याचे आई-वडील संघर्ष करत असताना दूर जाऊन ऐषआरामात जगणे स्वार्थीपणाचे ठरेल असे त्याला वाटत होते. तसेच, तो त्याच्या तीन नोकऱ्यांमधून जे पैसे कमवत होता, त्याची कुटुंबाला गरज होती. कोच रायली यांनी जेसीला काळजी न करण्यास सांगितले.एका आठवड्यानंतर, मिस्टर रायली यांनी जेसीसाठी एक चांगली बातमी दिली. ओहायो स्टेट युनिव्हर्सिटीला जेसीने तिथे प्रवेश घेतल्यास आनंदच होईल.



त्या शाळेने खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती देऊ केली नव्हती. मात्र, जेसीला त्याच्या राहण्याचा, खाण्याचा आणि शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी शाळेचे अधिकारी त्याच्यासाठी नोकऱ्यांची व्यवस्था करणार होते.सर्वात उत्तम म्हणजे, ०.८ यू. चे ट्रॅक प्रशिक्षक, लॅरी स्नायडर यांनी जेसीच्या वडिलांसाठी एक नोकरी शोधून दिली. जेसीने कॉलेजमध्ये काहीही केले तरी, ही नोकरी मिस्टर ओवेन्स यांची कायमची असणार होती. जेसीला फक्त हेच ऐकायचे होते. तो ओहायो स्टेटला जाण्यासाठी अधीर झाला होता.



तो जगभर प्रसिद्ध झाला. त्याची सर्वोत्तम कामगिरी २५ मे १९३५ रोजी मिशिगन विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय महाविद्यालयीन ट्रॅक अँड फील्ड चॅम्पियनशिपमध्ये झाली. त्या दिवशी, जेसीने शंभर-यार्ड धावण्याच्या शर्यतीत जागतिक विक्रमाची बरोबरी केली. त्याने २२०-यार्ड लो हर्डल्समध्ये नवीन जागतिक विक्रम आणि लांब उडीतही नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला. त्याची लांब उडी इतकी लांब होती की तो विक्रम पंचवीस वर्षे टिकून राहिला.हे सर्व जेसीच्या १९३६ च्या ऑलिम्पिक खेळांमधील कामगिरीची एक झलक होती. जर्मनीतील बर्लिन येथे झालेल्या त्या खेळांमध्ये, जेसी ओवेन्सने चार सुवर्णपदके जिंकून ट्रॅक-अँड-फील्ड स्पर्धांमध्ये वर्चस्व गाजवले. त्याने शंभर-मीटर धावण्याच्या शर्यतीत आणि दोनशे-मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम स्थान पटकावले आणि विजयी चार-बाय-शंभर-मीटर रिले संघासाठी अंतिम टप्प्यात धावला. जेसीचे चौथे सुवर्णपदक त्याला लांब उडीतील विजयासाठी देण्यात आले. हा तो विजय होता जो तो सर्वात जास्त जपायचा आणि त्याचे कारण सांगायला त्याला आवडायचे.४३१९३६ मध्ये, जर्मनीवर नाझींचे राज्य होते, ज्यांचा नेता हुकूमशहा अ‍ॅडॉल्फ हिटलर होता. नाझींचा असा विश्वास होता की इतर सर्व लोक त्यांच्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत.

ऑलिम्पिक खेळ सुरू होणार असताना, जर्मन वृत्तपत्रांनी अमेरिकन संघातील कृष्णवर्णीय सदस्यांना कमी लेखले. यामुळे एरवी शांत आणि समजूतदार असलेल्या ओवेन्सला प्रचंड राग आला.जेसी ओवेन्सने भाग घेतलेली पहिली स्पर्धा लांब उडीची होती. नाझींच्या अपमानामुळे तो इतका अस्वस्थ झाला होता की त्याला लक्ष केंद्रित करणे कठीण जात होते.

त्यात भर म्हणजे, त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी लूझ लाँग नावाचा एक जर्मन होता. लाँग, एक उत्कृष्ट खेळाडू असून, जर्मन श्रेष्ठत्वाचे उत्तम उदाहरण म्हणून त्याची प्रशंसा केली जात होती. या स्पर्धेचे वर्णन एक चुरशीची लढत म्हणून केले जात होते. त्यामुळे हे सिद्ध झाले असते की जर्मन ही एक श्रेष्ठ वंश होती.जेव्हा ओवेन्सने लांब उडीच्या अंतिम फेरीसाठीच्या पात्रता फेरीत दोन खराब उड्या मारल्या, तर दुसरीकडे लाँगने अत्यंत चांगली कामगिरी केली, तेव्हा असे वाटत होते की नाझींना त्यांचा गुण मिळेल. मग, ओवेन्स पात्रतेसाठी आपला शेवटचा प्रयत्न करण्याच्या प्रतीक्षेत असताना, लूझ लाँग त्याच्याकडे आली."नमस्कार, जेसी ओवेन्स," लाँग म्हणाली. "तू अंतिम फेरीत पोहोचावेस अशी माझी इच्छा आहे, पण त्यासाठी आधी तुला शांत राहावे लागेल आणि एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. तुला चाचण्यांमध्ये सर्वोत्तम असण्याची गरज नाही. तुला फक्त पात्र ठरायचे आहे." लाँगने ओवेन्सला सुरक्षित पात्रता उडी कशी मारावी याबद्दल सल्ला दिला.





ओवेन्सने लाँगचा सल्ला ऐकला आणि एक चांगली उडी मांरली. तो लाँगच्या मदतीबद्दल कृतज्ञ होता. पण उडी मारण्याच्या सल्ल्यापेक्षाही एक गोष्ट अधिक महत्त्वाची होती. गर्दीसमोर एका कृष्णवर्णीय अमेरिकन व्यक्तीशी मैत्री. शौर्य, माणुसकी आणि खिलाडूवृत्तीच्या या प्रदर्शनाने जेसी ओवेन्सवर खोलवर छाप पाडली.लांब उडीच्या अंतिम फेरीत जेसीला ही मदत परत करण्याची संधी मिळाली. लाँगने एक उत्कृष्ट उडी मारल्यानंतर, तो वेदना होत असलेला पाय धरून लंगडत एका बाजूला गेला. ओवेन्स घाईघाईने त्याच्याकडे गेला. नाझी अधिकारी रागाने बघत असताना, ओवेन्सने वेदना कमी करण्यासाठी लाँगच्या जखमी पायाला मालिश केली.जेसी ओवेन्सने २६ फूट, ५ आणि ५/१६ इंचाच्या विक्रमी उडीसह लांब उडी जिंकली. यामुळे त्याला बहुप्रतिक्षित सुवर्णपदक मिळाले. त्याला एक जिव्हाळ्याची मैत्रीही मिळाली, जी दुसऱ्या महायुद्धादरम्यान लूझ लाँग युद्धात मारला जाईपर्यंत टिकली. ऑलिम्पिकनंतर, अमेरिकेत परतल्यावर जेसी ओवेन्सचे नायकासारखे स्वागत करण्यात आले. याची सुरुवात न्यूयॉर्क शहरात त्याच्या सन्मानार्थ एका मोठ्या परेडने झाली. सर्वजण त्या महान खेळाडूचा आणि उत्तम तरुणाचा आदर आणि प्रशंसा करत असत. हा आदर आणि प्रशंसा त्याच्या उर्वरित आयुष्यातही टिकून राहिली.



आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात, जेसी ओवेन्स यांनी युवा आयोगांवर आणि यू.एस. क्रीडा विभागाचे सदिच्छा दूत म्हणून काम केले. ३० मार्च १९८० रोजी त्यांचे निधन होईपर्यंत ते ऑलिम्पिक उपक्रमांमध्येही सहभागी होते. 'जगातील सर्वात वेगवान मानव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या व्यक्तीला विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सर्वश्रेष्ठ धावपटू म्हणून गौरविण्यात आले. जरी जेसी ओवेन्स यांचे सर्व विक्रम मोडले गेले असले तरी, त्यांची कामगिरी क्रीडा इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहे!

समाप्त